www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार

मराठी

दैं.युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : २१६ वा मंगळवार दि. २१ एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## वाढत्या उकाड्यात कूलर आणि फ्रीज घेण्याकडे नागरिकांची वाढती मागणी

दैनिक युवक आधार
पनवेल ( वार्ताहर ) : एप्रिल महिना मध्यावर आला असून, कडक उकाडा जाणवू लागला आहे. त्यामुळे पनवेलकरांचा एसी, कूलर आणि फ्रीज घेण्याकडे वाढला आहे. गेल्या काही दिवसांपासून कडकडीत उन्हाळा सुरू झाला आहे. त्यामुळे पनवेलचा पारा ३८ ते ४० अंशांपर्यंत पोहोचला आहे, परिणामी पनवेलकरांची पावले एसी, कूलर आणि फ्रीज अशा वस्तू घेण्याकडे वळू लागली आहेत. उन्हापासून दिलासा मिळावा, या हेतूने पानवेलकरांच्या या वस्तूंच्या खरेदीसाठी दुकानात गर्दी करू लागले आहेत. यामुळे एसी, पंखे, कूलर, फ्रीज या वस्तूंची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ही वाढती मागणी लक्षात घेऊन, दुकानदारांनीही ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी जाहिरात शिवाय इतर युक्त्या वापरून या साधनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न चालवला आहे.सध्या बाजारात पंख्यांना असलेली मागणी कमी झाली असून, ग्राहकांचा ओढा एसी आणि कूलर घेण्याकडेच जास्त आहे. तर सामान्य नागरिकांना एसीची खरेदी आवाक्याबाहेरची वाटत असल्याने त्यांनी कुलरला पसंती दिल्याचे दिसून येत आहे. दररोज ६ ते ७ कूलर व ३ ते ४ एसी विक्रीला जात असल्याची माहिती येथील विक्रेत्यांनी दिली आहे, तर मोठ्या दुकानांत हेच प्रमाण २५ ते ३० कूलर व १० ते १५ एसी इतके असल्याचे सांगण्यात आले आहे. तर फ्रीजची विक्रीही मोठ्या प्रमाणात झाल्याचे व्यापारी सांगत आहेत.उन्हाचा कडाका वाढल्यामुळे रोज दुकानांमध्ये एसी व कूलर घेण्यासाठी ग्राहकांची रीघ लागत आहे. काहीजाण है लग्नसराई सुरू असल्यामुळे एसी किया कूलर भेट देण्यासाठी खरेदी करीत असल्याचे व्यापारी सांगत आहेत. मागील वर्षे एवढीच किंमत यंदादेखील आहे. त्यामुळे या वस्तूंच्या खरेदीचे प्रमाण वाढले असल्याचे बाजारातील व्यापारी सांगत आहेत.

## पनवेल बाजारपेठेत रानमेवा मोठ्या प्रमाणात विक्रीला

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )** : ऐन उन्हाळ्यात हवाहवासा वाटणाराआणि लांबून पाहूनच तोंडाला पाणी सुटेल इतका चविष्ट असणारा रानमेवा सध्या पनवेल परिसरातील बाजारात दाखल झाला आहे. छोटा आवळा, बोरे, तोतापुरी कैरी, जांभूळ, करवंद, ताडगोळे, फणस गरे, पिवळा रानमेवा असा रानमेवा भरलेल्या टोपल्या पनवेल परिसरातील ठिकठिकाणी नजरेस पडत आहेत.

यातील ताडगोळे, करवंदे, जांभूळ, पिवळा रानमेवा यांना सध्या जास्त मागणी असल्याने त्यांचे भावही दरवर्षीप्रमाणे चढेच असल्याचे रानमेवा विक्रेत्यांकडून सांगितले जाते.पनवेल परिसरातील रस्त्याच्या कडेला, गावागावातील बाजारात विकण्यासाठी आलेला आंबट, गोड, तुरट रानमेवा खाण्यासाठी पनवेलकरांची झुंबड उडत आहे. उन्हाळा म्हटल्यावर नारळ, आंबा, फणस या पलिकडचा रानमेवा कुणाला दिसत नाही. पण बोरे, रानजांभळे, आवळा, चिंच, पिवळा रानमेवा, ताडगोळे, करवंदे या अस्सल मेव्याने पनवेल येथील बाजारात हजेरी लावल्याने बाजारात घमघमाट सुटत असल्याचे चित्र दिसत आहे.

या रानमेव्यातील प्रत्येक फळाचे स्वतःचे वेगळे वैशिष्टयही आहे. रानमेवा गुणकारी असण्यासह त्याची चवही मनाला तृप्त करणारी आहे. त्यामुळे इतरवेळी जंकफूड, चाट पदार्थावर ताव मारणारी तरुणाई बाजारात आलेला रानमेवा आवडीने खात असल्याचे चित्र ठिकठिकाणी दिसत आहे. २० ते ५० रुपयांमध्ये रानमेवा विकला जात असल्याने खवय्यांच्या खिशालाही परवडणारा आहे. पनवेल परिसरात रानमेवा पीक जरी नामशेष झाले असले तरी ग्राहकांची मागणी पाहता मोठ्या प्रमाणात रानमेवा बाजारात दाखल होत आहे. सध्या ताडगोळे १२० ते १६० रुपये डझन, जांभूळ -४०० ते ५०० रुपये प्रति किलो, पिवळा रानमेवा-३०० ते ४०० रुपये प्रति किलो, करवंदे २० ते ४० रुपये वाटा असा आहे .

# 'जेईई-मेन'मध्ये राज्यातील ३ विद्यार्थ्यांचा पैकीच्या पैकी स्कोअर

## दोन मुलींचाही समावेश; सातजण राजस्थानचे

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**
**नवी दिल्ली/पुणे** : राष्ट्रीय परीक्षा संस्थेद्वारा (एनटीए) अभियांत्रिकीच्या संयुक्त प्रवेश परीक्षेचा (जेईई-मेन) निकाल शनिवारी घोषित करण्यात आला. यात २४ विद्यार्थ्यांनी १०० एनटीए स्कोअर प्राप्त केला आहे. त्यात महाराष्ट्रातील आयुष रवी चौधरी, सानिध्या सराफ आणि विशाद जैन या तीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. दोन मुलींनीही पैकीच्यापैकी स्कोर मिळवला.पूर्ण १०० एनटीए स्कोअर मिळविणाऱ्या विद्यार्थ्यात सर्वाधिक सातजण

JEE (Main)
Joint Entrance Examination

राजस्थानचे आहेत. तेलंगणा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी ३, दिल्ली, पश्चिम बंगाल आणि गुजरातचे प्रत्येकी २ आणि कर्नाटक व आंध्र प्रदेशातील प्रत्येकी १ विद्यार्थी यात आहे. अव्वल आलेल्यांपैकी २१ जण सामान्य श्रेणीतील आहेत. प्रत्येकी १ जण एससी, एसटी व ओबीसी वर्गातील आहेत. जेईई-मेन पेपर-१ व पेपर-२ च्या स्कोअरनुसार जेईई ॲडव्हान्स्डसाठी विद्यार्थ्यांना पात्र ठरविले जाईल.

### गैरप्रकारांमुळे ११० विद्यार्थ्यांचा निकाल रोखला

पहिल्या सत्रात ३९ विद्यार्थ्यांचा निकाल गैरप्रकारांच्या आरोपांवरून राखून ठेवण्यात आला होता. दुसऱ्या सत्रात ११० विद्यार्थ्यांचा निकाल रोखण्यात आला. २३ विद्यार्थ्यांचा निकाल त्यांची छायाचित्रे, बायोमेट्रिक विवरण व पडताळणीशी संबंधित इतर विसंगतींमुळे रोखण्यात आला.

### कसा ठरवला जातो एनटीए 'स्कोअर'?

अधिकाऱ्यांनी सांगितले की, एनटीए 'स्कोअर' हा गुणांच्या टक्केवारीसारखा नसून सामान्यीकृत स्कोअर आहे. एका सत्रात परीक्षेस बसलेल्या सर्व परीक्षार्थ्यांच्या सापेक्ष कामगिरीनुसार तो ठरविला जातो. प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्राप्त स्कोअरला १०० ते ० या परिमाणात परिवर्तित केले जाते. ज्या विद्यार्थ्यांनी दोन्ही परीक्षा दिल्या असतील, त्यांचा उत्तम स्कोअर मान्य केला जातो.ईडब्ल्यूएस श्रेणीसाठी कटऑफ ८०.३८, ओबीसी साठी ७९.४३, एससी साठी ६१.१५ आणि एसटी श्रेणीतील विद्यार्थ्यांसाठी कटऑफ ४७.९० टक्के निश्चित करण्यात आला आहे.

## पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्राच्या उरण तालुका विभागीय सदस्य नियुक्तीपत्र वाटप



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**
**उरण रायगड** : संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत असणाऱ्या पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र ही पत्रकारांच्या सहकार्यासाठी, सामान्य जनता आणि शासन यामधील एक दुवा म्हणून कार्य करत आहे. पत्रकारांना सहकार्य करण्याचेही संघटना कार्य करत आहे. या संघटने करिता २० एप्रिल २०२५ रोजी शासकीय विश्राम गृह उरण येथे पत्रकार सदस्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले, हे निवड करताना ज्यांना सामाजिक कार्य करण्याची आवड आहे अशा पत्रकारांची निवड करण्यात आली. यामध्ये तालुका कार्याध्यक्ष सचिन घबाडी उपाध्यक्ष तृप्ती भोईर, सदस्य रणिता ठाकूर, सायली म्हात्रे, यांना पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र अध्यक्ष डॉ अशोक म्हात्रे सर, उरण तालुका महिला उत्कर्ष समितीच्या अध्यक्षा पूजा चव्हाण, त्याचबरोबर ज्येष्ठ पत्रकार प्रदीप पाटील,रंजना म्हात्रे, रंजना पाटील यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले. उरण तालुक्यामधील सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याबरोबरच पत्रकारांच्या उत्कर्षासाठी सदर समिती कार्य करणार आहे. तसेच उरण तालुक्यामध्ये वेगवेगळे प्रकारचे समाज उपयोगी कार्यक्रम राबवून समाजाला प्रोत्साहित करणार आहेत. एकंदरीत उरण तालुक्या मध्ये शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आलेले पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र अंतर्गत उरण तालुका सदस्य नियुक्ती पत्र कार्यक्रम चांगल्या प्रकारे पार पडले. आणि सदर नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांना तालुक्यातील प्रत्येक विभागातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. आणि तालुक्यासाठी चांगल्या प्रकारे काम करण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे.

## रायगड मधील वडखळ पोलीस ठाणे ठरले आय एस ओ स्मार्ट पोलिस ठाणे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांचा अधीक्षकांच्या हस्ते सन्मान



**दैनिक युवक आधार**
**पेण वार्ताहर** : रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते स्मार्ट पोलीस ठाणे अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.यामध्ये विशेष पेण तालुक्यातील वडखळ येथील पोलीस ठाणे सुसज्ज आणि गुन्हेगारीवर आळा बसवणारे असे ठरल्याने रायगड जिल्हया मध्ये वडखळ पोलीस ठाण्याला प्रथम क्रमांकाचे आय एस ओ स्मार्ट पोलीस ठाण्याचा दर्जा देण्यात आला आहे.या प्रसंगी रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांचा सन्मान करण्यात आला.

## पनवेल महानगरपालिका व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने अग्निशमन सेवा सप्ताह अंतर्गत नवीन पनवेल ते खारघर भव्य वाहन रॅलीद्वारे जनजागृती



**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी** : अग्निशमन सेवा सप्ताह २०२५ निमित्त नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पनवेल महानगरपालिका अग्निशमन दल व सिडको अग्निशमन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ एप्रिल रोजी नवीन पनवेल ते खारघर अशी भव्य अग्निशमन वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या रॅलीची सकाळी १०:०० वाजता नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरूवात करण्यात आली. पनवेल महापालिकेच्यावतीने मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अग्निशमन अधिकारी हरिदास सुर्यवंशी, उप अग्निशमन अधिकारी संदीप पाटील तसेच महापालिकेतील महिला व पुरुष अग्निशमन कर्मचाऱ्यांनी या रॅलीचे प्रतिनिधित्व केले.

नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरुवात झालेली ही रॅली खांदा कॉलनीमधील ब्रिजमार्गे कामोठे, कामोठे ते महामार्गावरून मंकी पॉइंट खारघर, मंकी पॉइंट ते शिल्प चौक, शिल्प चौक ते रामशेठ ठाकूर शाळा, ग्रामविकास भवन या मार्गाने येत खारघर अग्निशमन केंद्र येथे रॅलीची सांगता झाली.

या रॅलीमध्ये महापालिकेच्या अग्निशमन विभागातील १० बुलेट दुचाकी, ४ जीप, २ स्विफ्ट डिझायर कार, १२ अग्निशमन वाहने सहभागी झाली होती.

या रॅली दरम्यान अग्निशमन दल हे सजगतेचे व तत्परतेचे प्रतीक ठरणार आहे, नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे आणि अग्निसुरक्षेबाबत सजग व्हावे, असे आवाहन करण्यात आले. या रॅलीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी ,"एकत्र येऊ, अग्निसुरक्षित भारत घडवू" असा संदेश देण्यात आला.

अग्निशमन सेवा सप्ताह दरवर्षी १४ ते २० एप्रिल दरम्यान साजरा केला जातो. १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबईतील व्हिक्टोरिया डॉक येथे झालेल्या दुर्घटनेत ७१ शूर अग्निशमन कर्मचाऱ्यांनी प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या स्मरणार्थ आणि समाजात अग्निसुरक्षेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी हा सप्ताह साजरा केला जातो.

महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्यावतीने या सप्ताहादरम्यान विविध प्रात्यक्षिके, कळंबोली डिमार्ट येथे मॉक ड्रिल्स, प्रशिक्षण कार्यक्रम आणि जनजागृती उपक्रम घेण्यात आले.जेणेकरून नागरिक, कर्मचारी, उद्योग आणि संस्था अग्निसुरक्षेबाबत अधिक सजग होतील.



## स्वराज्य भिकाजी वायाळ गुरुदेव दत्त भक्त परिवार व बाल संस्कार केंद्र तर्फे बालसंस्कार वर्ग

**दैनिक युवक आधार**
**पुणे प्रतिनिधी । राजेश सदाशिव भोर** : स्वराज्य भिकाजी वायाळ गुरुदेव दत्त भक्त परिवार व बाल संस्कार केंद्र पेठ, ता आंबेगाव ,पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने पेठ (सातगाव पठार) या ठिकाणी बालसंस्कार वर्ग घेण्यात आला.. यामध्ये मुलांना श्री स्वामी समर्थ सेवा ,गणपती बाप्पा सेवा, शिक्षण व आध्यात्मिक ऊर्जा तसेच मूल्य शिक्षणाचे भाग लहानपणापासून कसे जोपायसाचे व त्याचे महत्त्व आपलं जीवन कसं जगायचं दररोज दैनंदिन नित्यक्रम कसा असावा.. अंतर्गत ऊर्जा व अंतर्गत स्वच्छता त्याच पद्धतीने आपला परिसर स्वच्छ सुंदर कसा असावा दररोज आई-वडिलांच्या गुरुजनांचे चरण स्पर्श दर्शन सर्व लहान थोरांचा आदर करावा..शाळेमध्ये शिकवलेल्या विद्येचा घरी आल्यानंतर पुन्हा मन लावून अभ्यास करावा.

मोबाईल काळाची गरज असली तरी त्याच्यामध्ये चांगले वाईट काय घ्यायचे याचे शिक्षण बालसंस्कार वर्गात देण्यात आले... रस्त्याने चालताना समोरून येणाऱ्या जाणाऱ्या गाड्या तसेच रस्ता ओलांडताना कुठली काळजी घ्यायची याबाबत विशेष मार्गदर्शन मुलांना करण्यात आले...यावेळी बाल संस्कार वर्गामध्ये मार्गदर्शन करताना सौ.वंदनाताई देवराम गावडे यांचे मुलांना बाल संस्कार वर्गात



अनमोल मार्गदर्शन लाभले.तसेच व्यसनमुक्ती जनजागृती सादरकर्ते व्यसनमुक्त जिवन काळाची गरज या विषयावर बोलताना.श्री दिलीप किसनराव आमले आपला माणुस यांनी योग्य मार्गदर्शन केले यावेळी सद्गुरु देसाई महाराज दत्त भक्त ह भ प रघुनाथ कराळे श्री रामशेठ काळे सौ अर्चना बुट्टे सदस्य पेठ ग्रामपंचायत श्री विलास हिरवे श्री गणेश नवले श्री जितेंद्र कांबळे तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालक ह भ प अमित कातळे या सर्वांचा शुभ हस्ते व्यसनमुक्ती जनजागृती प्रमुख मार्गदर्शक आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले यांचा या सर्वांच्या वतीने व्यसनमुक्त जीवन काळाची गरज योग्य असे सादरीकरण केले याबाबत सन्मान करण्यात आला.

# 'सदर्न टेल्स'ने नवी मुंबईत आणला दक्षिण भारताचा अस्सल स्वाद

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई, वार्ताहर** : नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर भागात आज 'सदर्न टेल्स' या नव्या रेस्टॉरंटचे भव्य उद्घाटन करण्यात आले. हे रेस्टॉरंट खास दक्षिण भारतीय पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा अनुभव देण्यासाठी सुरु करण्यात आले आहे.

उद्घाटन समारंभात मा. आमदार सौ. मंदाताई विजय म्हात्रे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी अनेक मान्यवर, मीडिया प्रतिनिधी आणि स्वादप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.हे रेस्टॉरंट श्री सतीश नायर आणि श्रीमती सुर्या नायर यांचा कौटुंबिक उपक्रम आहे. त्यांचे सुपुत्र सिद्धार्थ नायर हे या रेस्टॉरंटचे मुख्य शेफ (एक्झिक्युटिव्ह शेफ) म्हणून काम पाहत आहेत. 'सदर्न टेल्स' ही जागा



दक्षिण भारताच्या संस्कृती, स्वाद आणि पारंपरिक आदरातिथ्याचे सुंदर प्रतिक आहे.उद्घाटनप्रसंगी आमदार मंदाताई म्हात्रे म्हणाल्या,"'सदर्न टेल्स' हे बेलापूरसारख्या ठिकाणी एक सुंदर आणि स्वादिष्ट भर आहे. इथलं वातावरण, सेवा आणि पदार्थ उत्तम दर्जाचे आहेत. लवकरच हे रेस्टॉरंट खवय्यांचं आवडतं ठिकाण बनेल याबाबत मला पूर्ण विश्वास आहे. नायर कुटुंबाला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!"'सदर्न टेल्स'चे मेनू पारंपरिक दक्षिण भारतीय चवींनं भरलेले आहे, मात्र त्यात आधुनिक ट्विस्ट देण्यात आला आहे. काही खास डिशेस म्हणजे प्रॉन्स रसम, पौष्टिक ड्रमस्टिक प्रॉन्स सूप, झणझणीत कंथारी प्रॉन्स, केरल स्टाईल मटण करी, कोट्टायम मटण रोस्ट आणि मटण पेपर फ्राय. समुद्री अन्नाच्या प्रेमींना तंदूरी पोम्फ्रेट, फ्रायड नथोली (छोट्या माशा) आणि स्थानिक चवींनं सजवलेली किंग फिश यांसारख्या डिशेस इथे मिळतील. शाकाहारी पर्यायांमध्ये स्टफ्ड मशरूम टिक्का, कंथारी पनीर आणि ब्रोकोली टिक्कासारखे स्वादिष्ट पदार्थही उपलब्ध आहेत.

आपल्या आपुलकीच्या स्वागतासाठी, घरगुती वातावरणासाठी आणि चविष्ट पारंपरिक जेवणासाठी, 'सदर्न टेल्स' हे रेस्टॉरंट नवी मुंबईतील खाद्यप्रेमींमध्ये लवकरच एक खास ओळख निर्माण करणार आहे.

## पत्रकार आनंद पवार यांनी प्रकाशित केलेल्या प्रज्ञासूर्य जयंती विशेष अंकाचे प्रकाशन आ. प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते

**दैनिक युवक आधार**
**रसायनी (प्रतिनिधी)** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती दिनाचे औचित्य साधून रसायनी येथील पत्रकार आनंद पवार यांनी प्रकाशित केलेल्या प्रज्ञासूर्य अंकाचे प्रकाशन पनवेलचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते व महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक साजनजी बेंद्रे व विशालजी यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दि.१५ एप्रिल रोजी नवीन पनवेल येथे पनवेल महानगर पालिकेचे मा. नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी आयोजित केलेल्या भीम जयंती महोत्सवा प्रसंगी करण्यात आले.

या प्रकाशन सोहळ्या प्रसंगी पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा आंबेडकर चळवळीचे झुंजार नेते प्रकाश बिनेदार मा.भारतीय जनता पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी,मा. नगरसेविका दर्शना भोईर,भाजपाचे नगरसेवक मा. नगरसेवक नितीन पाटील,रवी नाईक, ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी आदी मान्यवर




यावेळी उपस्थित होते.पत्रकार आनंद पवार हे दरवर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त प्रज्ञासूर्य या विशेष अंकाच प्रकाशन करत असतात प्रज्ञासूर्य या जयंती विशेष अंकामध्ये डॉ.बाबासाहेबांच्या जीवनपटावर आधारित महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिकांचे लेख कविता या प्रज्ञासूर्य अंकामध्ये प्रकाशित केले जातात.

प्रज्ञासूर्य हा विशेषांक वाचकांसाठी लोकप्रिय ठरले असल्याची प्रतिक्रिया साहित्यिक लेखक व सामान्य वाचकांमधून व्यक्त होत आहे.

# ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन प्रकल्पाचं अधिकाऱ्यांनी केलं यशस्वी टेस्टींग

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी । गौतम सोनवणे** : अनेक दिवसांपासून बहू प्रतिक्षेत असलेल्या पैठण तालुक्यातील तोंडोळी व परिसरातील शेतकऱ्यांचा टर्निंग पॉईंट ठरणाऱ्या पाट पाण्याची प्रतीक्षा आता संपणार असून खासदार संदिपान पाटील भुमरे आणि आमदार विलास बापू भुमरे यांच्या मार्गदर्शना नुसार शनिवार दि.१९ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १ वाजून ४० मिनिटांनी ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना भाग एक टप्पा दोन येथील पंपाचे टेस्टिंग अधीक्षक अभियंता भारत शिंगाडे तसेच अधीक्षक अभियंता यांत्रिकी विभाग तसेच कार्यकारी अभियंता उमेश वानखेडे यांच्या सूचनेनुसार पंपगृहातील कळ दाबून यशस्वी चाचणी घेण्यात आली यावेळी उपअभियंता विठ्ठल गावंडे , नवनाथ पिसोटे , शाखा अभियंता प्रशांत कोरके, सरपंच संजय गरड व स्थानिक शेतकरी यांच्या उपस्थितीत पंपाचे टेस्टिंग करण्यात आले.

दरम्यान या प्रकल्पाच्या पाट पाण्यामुळे हजारो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणाऱ्या शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या असून सर्वत्र आनंदी आनंद पहायला मिळत आहे.

**************



## बारवई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती जल्लोषात साजरी

**दैनिक युवक आधार**
**रसायनी (आनंद पवार)** : आदर्श मित्र मंडळ रमाई महिला मंडळ बारवई, तालुका पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती महोत्सव मोठा जल्लोषात साजरा करण्यात आला.

सालाबाद प्रमाणे यंदाही पनवेल तालुक्यातील बारवई येथे आदर्श मित्र मंडळ रमाई महिला मंडळ यांनी सुंदर रित्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.सकाळी ९:३० वा.ध्वजारोहण तदनंतर बुद्ध पूजापाठ कार्यक्रम घेण्यात आला दुपारी लहान मुले व महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी येथूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात आली.डीजे ढोल ताशाच्या गजरात व फटाक्यांच्या आताषबाजीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व महापुरुषांच्या जय घोषाने संपूर्ण परिसर दणाणून निघाला. मिरवणुकीमध्ये आबाल वृद्ध मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रात्री अजय गायकवाड प्रस्तुत आर्केस्ट्रा रायगडचा टायगर या भीम गीतांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक अजय गायकवाड व सुमेध जाधव आणि सहकाऱ्यांनी भीमगीते व प्रबोधनात्मक गीते सादर करून साऱ्यांची मने जिंकली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदर्श मित्र मंडळ, रमाई महिला मंडळ (बारवई) यांनी विशेष मेहनत घेतली.

# उल्हास प्रभात राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा 2025 संपन्न..!

**दैनिक युवक आधार**
**बदलापू प्रतिनिधी । गुरुनाथ तिरपणकर** : बदलापूर मधून 31 वर्षापासून प्रसिद्ध होणारे वृत्तपत्र उल्हास प्रभात चा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा नुकतेच संपन्न झाला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे, बदलापूर-अंबरनाथ बिल्डर असोसिएशनचे अध्यक्ष संजय जाधव, सकाळचे मुख्य संपादक राहुल गडपाले, उल्हास प्रभातचे संपादक डॉ. श्री. गुरुनाथ बनोटे यांच्यासह विशेष पुरस्कार विजेते चंद्रकांत खडकबाण, कैलास मनोरे, रवी कुंभार, गजानन टोहके, एड. संतोष मळवीकर, देवेसिंग राजपूत, डॉ. चित्रलेखा माने व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या राज्यभरातील 70 जणांना विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.अध्यक्षीय भाषणात आमदार किसन कथोरे यांनी सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे कौतुक करत अशी व्यक्तिमत्व समाजासमोर आणण्याचे काम करणाऱ्या उल्हास प्रभात चे संपादक डॉ. गुरुनाथ बनोटे यांचे कौतुक केले गेली 12 वर्षापासून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना समाज रत्न, आरोग्य रत्न, शिक्षण रत्न अशा विविध प्रकारचे पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे. राज्यभरातून आलेल्या दिवाळी अंकांमधून 13 दिवाळी अंक निवडण्यात आले यामध्ये प्रथम क्रमांक अवतरण सकाळ मुंबई, द्वितीय क्रमांक उद्याचा मराठवाडा नांदेड, तृतीय क्रमांक अपेक्षा कोथरूड पुणे, सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक फोर्ट ट्रस्ट कामगार मुंबई ,सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक वेदांत श्री पुणे, सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक जमाना धमाका अहमदनगर, रणांगण नवी मुंबई, नृत्यवकाश पुणे, साहित्य सवाना नाशिक, सुभाषित नाशिक , पुरुष स्पंदन मुंबई, अर्थशक्ती मुलुंड यांना उत्कृष्ट व सर्वोत्कृष्ट पुरस्कार देऊन गौरविण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकेश दामोदरे यांनी केले तर कार्यक्रमाची प्रस्तावना आरती नेरपगार यांनी केले या कार्यक्रमासाठी विशेष मेहनत सहसंपादक अतुल नेरपगार गुरुनाथ तिरपनकर, प्रमोद हरपुडे, भावेश चंद्रा आदींनी अथक परिश्रम घेऊन हा कार्यक्रम पार पडला. हा सोहळा काटदरे मंगल कार्यालयात पार पडला.



## भाजपा मंडळ अध्यक्ष पदी अमर पाटील यांची निवड




**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर** : भाजपाच्या संघटनात्मक निवडणुकीमध्ये आज सर्व प्रक्रिया पार पडली व कळंबोली मंडळाच्या अध्यक्षपदी माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील यांची निवड करण्यात आली . अमर पाटील यांची निवड होताच सर्व कार्यकर्त्यांनी जल्लोष व्यक्त केला . यावेळी मावळते अध्यक्ष श्री रविनाथ पाटील , मंडल निवडणूक प्रमुख रमेश मुंडे , माजी नगरसेवक बबन मुकादम भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे जिल्हा चिटणीस संदीप म्हात्रे मंडळ सरचिटणीस दिलीप बीस्ट अमर ठाकूर महिला मोर्चा अध्यक्षा मनीषा निकम युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक आदी पदाधिकारी उपस्थित होते . अमर पाटील यांना शुभेच्छा देताना रविनाथ पाटील यांनी सर्व कार्यकर्त्यांना संबोधित केले की जसं मला सहकार्य केले तसेच आपण नवीन अध्यक्षांना सहकार्य करून पक्ष वाढीसाठी काम करावे . बबन बारगजे यांनी शुभेच्छा देताना असे सांगितले की भारतीय जनता पार्टी हा एक असा पक्ष आहे की जिथे लोकशाही आहे व लोकशाही मार्गाने सर्व अध्यक्षांची निवड होत असते तसेच येथे वैयक्तिक स्वार्थापेक्षा पक्षाला प्राधान्य दिले जाते . भाजपाने पक्षात सर्व नव तरुणांना संधी दिलेली आहे त्यामुळे सर्वांनी एकमेकांनी हातात हात घालून काम करावे . त्यावेळी बबन मुकादम यांनीही मनोगत व्यक्त केले व आभार प्रदर्शन दिलीप बिस्ट यांनी केले . नवनिर्वाचित अध्यक्ष अमर पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना लोकनेते रामशेठ ठाकूर आमदार प्रशांत ठाकूर जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व सर्व पक्ष नेतृत्वाचे आभार मानले व पक्षाने जी जबाबदारी दिली आहे ती मी प्रामाणिकपणे पार पाडीन असे आश्वासन दिले .

## ब्रह्माकुमारीज संस्थेच्या माजी मुख्य प्रशासिका दादी रतनमोहिनी यांना श्रद्धांजली.

### सर्वांच्या सहयोगाने ब्रह्माभोजनाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**रणजीत सिंह ठाकूर । रिसोड** : प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय रिसोड च्या संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी ज्योती दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली दि. 20 एप्रिल 2025 रविवारी संस्थेच्या माजी मुख्य प्रशासिका आदरणीय राजयोगिनी ब्रह्माकुमारी रतन मोहिनी दादी जी यांच्या स्मृतीनिमित्त सेवा संस्थेच्या सर्व ज्ञानार्थीनी ब्रह्मा भोजनाचे आयोजन केले होते. दादी रतनमोहिनी यांचे आठ एप्रिलच्या सकाळी एक वाजून वीस मिनिटांनी त्यांच्या वयाच्या 101 व्या वर्षी निधन झाले होते.दादी रतनमोहिनी यांनी वयाच्या तेराव्या वर्षी ब्रह्माकुमारी संस्थेशी आयुष्य समर्पित त्यानंतर वयाचे 87 वर्ष त्यांनी सतत ब्रह्माकुमारी संस्थेच्या माध्यमातून देश विदेशात सेवा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करून ब्रह्मकुमारीज संस्थेच्या विकासात, प्रगतीत व भरभराटीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. रिसोड सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी ज्योती दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी विशेष स्मृति सभेचे आयोजन करण्यात आले होते संचालिका ब्रह्माकुमारी ज्योती दीदींनी दादीच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पित करुन श्रद्धांजली अर्पित केली तर ब्रह्माकुमारी गीता दीदी सह सर्व उपस्थित ज्ञानार्थीनी दादी रतनमोहिनीजी यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून श्रद्धांजली अर्पित केली. प्रसंगी ज्योती दीदींनी दादी रतनमोहिनी यांच्या सेवा काळातील महत्वपूर्ण व प्रेरणादायी घटनाक्रमावर प्रकाश टाकला दादी सतत 40 वर्ष ब्रह्माकुमारी



युवा विंगच्या प्रमुख राहिल्या त्यांच्या कार्य काळामध्ये अनेक युवकांना संघटित व प्रोत्साहित करण्याचे कार्य संपूर्ण देशभर करण्यात आले. त्यांच्या नेतृत्वात निघालेल्या युवा पदयात्रेची नोंद लिमका बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये करण्यात आली. दादिनी जवळपास 70हजार किलोमीटर पदयात्रा काढून सव्वा करोड लोकांना शांती, प्रेम, एकता, सौदार्ह, विश्वबंधुत्व, अध्यात्म, व्यसनमुक्ती आणि राजयोग मेडिटेशन चा संदेश दिला त्यामुळे करोडो लोकांच्या जीवनात अमूलाग्र बदल झला. ब्रह्माकुमारी ज्योती दीदींनी दादी रतनमोहिनी यांच्या जीवनपटाचे अवलोकन करुन स्व उन्नती साधन्याचे उपस्थित सर्व ज्ञानार्थी भाऊ बहिणींना आवाहन केले. सर्वांच्या सहयोगाने दादीच्या स्मरणार्थ ब्रह्माभोजनचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी रिसोड सेवा केंद्रासह तालुक्यातील गीता पाठशाळेचे भाऊ बहिणी मोठया संख्येने उपस्थित होते.

## कामोठे पोलीस ठाण्याच्या सतर्कतेमुळे मोबाईल मालकांना सुपूर्द



**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )** : कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीतून हरवलेले विविध कंपन्यांचे तब्बल ४२ मोबाईल फोन त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले आहेत.

परिमंडळ २ चे पोलीस उप आयुक्त प्रशांत मोहिते आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांच्या हस्ते हे मोबाईल सुपूर्द करण्यात आले.

या जप्त केलेल्या मोबाईलची एकूण किंमत ७ लाख ७३ हजार रुपये आहे.

पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत, पोलीस हवालदार झोळ, पोलीस शिपाई कोकाटे, पोलीस शिपाई इलग आणि पोलीस शिपाई गायकवाड यांच्या पथकाने सीईआयआर पोर्टल आणि तांत्रिक तपासाच्या मदतीने हे हरवलेले मोबाईल विविध राज्यांतून शोधून काढले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांच्या उपस्थितीत मंगळवारी हे मोबाईल फोन त्यांच्या मालकांना वाटप करण्यात आले.

मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले.या यशस्वी कामगिरीबद्दल पोलीस उप आयुक्त प्रशांत मोहिते आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी कामोठे पोलीस ठाण्याच्या टीमचे अभिनंदन केले आहे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# खेर्डी- खडपोली औद्योगिक वसाहतीत सातत्याने वीज पुरवठा खंडित

## उद्योजकांना नुकसानीला जावे लागतेय सामोरे नॉर्थ रत्नागिरी इंडस्ट्रीज असोसिएशन तर्फे महावितरणला निवेदन



**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार । चिपळूण (प्रतिनिधी) :** तालुक्यातील खेर्डी व खडपोली औद्योगिक वसाहतीमध्ये सातत्याने वीज पुरवठा खंडित होतो किंवा कमी-जास्त दाबाने पुरवठा होत असल्याने उद्योजकांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.या दोन्ही औद्योगिक वसाहतीमध्ये वीज पुरवठामध्ये सातत्य रहावे, अशी मागणी नोर्थ रत्नागिरी इंडस्ट्रीज असोशिएनने येथील महावितरणचे कार्यकारी अभियंता श्री. गेडाम यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी कार्यकारी अभियंत्यांशी माननीय आमदार श्री. किरणजी सामंत यांनी दूरध्वनीवरून संपर्क साधून उद्योजकांच्या अडचणी समजून तातडीने उपाययोजना करावी अशा सूचना दिल्या.. उद्योजक व अधिकारी यांच्यामध्ये सकारात्मक चर्चा झाली.. तर राज्याचे उद्योगमंत्री तथा पालकमंत्री ना. उदय सामंत यांनी याविषयी लवकरच बैठक आयोजित करण्याची ग्वाही दिली आहे.यावेळी नॉर्थ रत्नागिरी इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अनिल त्यागी, उपाध्यक्ष गजानन कदम,सह-कार्यवाह अविनाश शिंदे, श्री एम पेपर मिलचे श्री स्वामी, उदय शेंडे, रौफ खतीब, शशिकांत देसाई, वैभव सुर्वे, तुकाराम डबाणे आदी उपस्थित होते.या निवेदनानुसार खेर्डी व खडपोली औद्योगिक वसाहतीमध्ये वारंवार वीज पुरवठा खंडित किंवा कमी जास्त दाबाचा होत असल्याने उद्योजकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. यात सुधारणा न झाल्यास उद्योजकांचे नुकसान होऊन रोजगारावर परिणाम होण्याची शक्यता आहे. संघटनेला खालील प्रमाणे बदल अपेक्षित आहत.. सर्व प्रथम एम.आय.डी.सी एरियामधील विद्युत पुरवठा करणारा फीडर हा स्वतंत्र ठेवावा जेणेकरून त्याचा मेंटनंस ब्रेकडाऊन पिरीयड कमी होईल. तसेच या एरियातील सर्व कनेक्शन पोल वरून न देता अंडरग्राऊंड केबलींग ने द्यावे त्यामुळे एम.आय.डी.सी एरियात येणाऱ्या मोठ्या कंटेनर तसेच पावसाळ्यातील वादळवाऱ्यामुळे होणारा शटडाऊन टाळता येईल. सध्या खेर्डी व खडपोली भागात असलेल्या वीज मंडळाचा कर्मचारी आणि आधीकारी यांना त्यांच्या कामा बाबत पुर्ण माहिती नाही अथवा त्यांना विद्युतपुरवठा बंद झाल्याने उद्द्याजकांच्या अडचणी व नुकसानीचे गांभीर्य नाही असे दिसून येते.

तरी सर्वप्रथम त्यात त्वरित बदल होऊन आमच्या औद्योगिक क्षेत्राच्या देखभालीसाठी जवाबदार व्यक्तीची नियुक्त करण्यात यावा, असे या निवेदनात नमूद करण्यात आले

# वनक्षेत्रातील पाणवठे कोरडेठाक, तहानलेल्या वन्य प्राण्यांची मानवी वस्तीकडे धाव

## रस्त्यालगत पाणवठे असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले :- डॉ.गणेश ढवळे




**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) :** सध्या उन्हाचा पारा वाढत असल्याने बाष्पीभवनाचा वेग आधिकच वाढला असून परीणामी साठवण तलाव आणि धरणाच्या पाण्याने तळ गाठला असून बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्र अंतर्गत बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी, सोमनाथवाडी, लगत असलेल्या वनक्षेत्रातील हरिण, मोर, लांडोर, वानर आदि वन्यजीव वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे कोरडेठाक पडल्याने गाव तलावाकडे धाव घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही वर्षांपूर्वी पोखरी (घाट) येथील गावतलावावर पाण्याच्या शोधार्थ आलेल्या लांडोराचा कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यु झाला होता. वनविभागाने कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत मात्र त्यात नियमित पाणी सोडण्यात येत नाही. महिनाभरापुर्वी सोडलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ साचल्याने पाणी पिण्यास योग्य नाही. वनविभागाने वन्यप्राण्यांसाठी नियमित पाणवठ्यात पाणी सोडणे आवश्यक आहे. परंतु त्यात नियमितता नसल्याने काही पाणवठे कोरडेठाक तर काही पाणवठ्यात शेवाळ आढळून आले आहे. पिंपरनई शिवारातील पाणवठा रोडलगत बांधण्यात आला असुन रोडवरून जाणाऱ्या वाहनांच्या धडकेने वन्यजीव मृत्युमुखी पडल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. वनविभागाने नियमित वन्यप्राण्यांसाठी पाणवठ्यात पाणीपुरवठा करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे

# आ.संजय बनसोडे यांनी इतिहास निर्माण केला - केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले

## केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली विश्वशांती बुध्द विहाराची पाहणी

**दैनिक युवक आधार**
**संजीवकुमार गायकवाड । लातूर :** जिल्यातील उदगीर मतदार संघाचा भौतिक विकास करण्यासाठी आमदार संजय बनसोडे यांनी मागील पाच वर्षाच्या काळात जीवाचे रान करून मतदारसंघाचा कायापालट केला आहे. शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले असून त्यातच उदगीर सारख्या ठिकाणी 'विश्वशांती बुद्ध' विहाराची निर्मिती केली व या विहाराच्या लोकार्पण सोहळ्याला महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना बोलावून माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी एक इतिहास निर्माण केला असल्याचे मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री





रामदास आठवले यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरातील ' विश्वशांती बुध्द' विहारातील सदिच्छा भेट देवून पाहणी करताना बोलत होते.यावेळी तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी, चंद्रकांत चिकटे, देविदास कांबळे, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, अनिल मुदाळे, ज्ञानेश्वर बिरादार, हिपजु रहेमान हाशमी, नरसिंग कदम, शाहबाज शेख, आदी उपस्थित होते.पुढे बोलताना ना.रामदास आठवले यांनी, आ.संजय बनसोडे यांनी, उदगीर व जळकोट येथे प्रशासकीय इमारत, शासकीय विश्रामगृह, मराठा भवन, लिंगायत भवन, बुध्द विहार, शादीखाना, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय, तिरु नदीवरील बॅरेजेस, महावितरणे कार्यालय, ग्रामीण रूग्णालये, महापुरुषांचे पुतळे, जळकोट व उदगीर शहराला राष्ट्रीय महामार्गाने जोडले, विविध वाडी तांड्यावर योजना पोहचवल्या, वॉटरग्रीड योजना आणली.

भविष्यातील बेरोजगारीचा विचार करुन उदगीर व जळकोटच्या एम.आय.डी.सी. चा प्रश्न मार्गी लावुन येथील बेरोजगार तरूणांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचा माझा निर्धार त्यांनी केला आहे.

त्यांच्या याच कामाची पावती म्हणून मतदार संघातील जनतेने त्यांना ९३ हजारापेक्षा जास्त मताधिक्य देवून विजयी केले असल्याचे ना.आठवले यांनी सांगितले.यावेळी पक्षाचे पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदई तलावासमोर आढळला मृतदेह



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर :** पनवेल तालुक्यातील आदई तलावासमोर मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर एका इसमाचा मृतदेह आदळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत .सदर अनोळखी पुरूष वय ५० वर्षे अंदाजे, चेहरा- उभट, नाक-सरळ, वर्ण-गोरा, कपडे-नाही, बांधा-सडपातळ आहे . या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यानी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक बालाजी पवार मो. नंबर ९८२३१७५०५१ यांच्याशी संपर्क साधावा

# कल्याणी खुटाळे हिची महसूल सहाय्यक पदी निवड

**दैनिक युवक आधार**
**सणसर । विकास क्षत्रिय :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एम पी एस सी) घेण्यात आलेल्या परीक्षेतून इंदापूर तालुक्यातील बेलवाडी गावची कन्या कु. कल्याणी रामचंद्र खुटाळे हिची महसूल सहाय्यक या पदासाठी निवड झाली आहे. कल्याणीचे प्राथमिक शिक्षण पहिली ते चौथीपर्यंत थोरातवाडीच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये झाले.तसेच पाचवी ते दहावीचे शिक्षण इंदापूर तालुक्यातीलच श्री छत्रपती शिक्षण संस्थेच्या श्रीमती हिराबाई हरिभाऊ देसाई विद्यालय बेलवाडी येथे झाले. त्यानंतर अकरावी व बारावीचे शिक्षण तिने वालचंदनगर येथील वर्धमान विद्यालय येथे घेतले.तिचे पुढील शिक्षण बारामती तालुक्यातील माळेगाव येथे घेतल्याची माहिती मिळाली. त्यानंतर एमपीएससी चा अभ्यास करण्यासाठी पुणे येथे गेली चार वर्षे ती शिक्षण घेत आहे व आज महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या एमपीएससी परीक्षेतून महसूल सहाय्यक पदी तिची निवड झाली आहे.अतिशय गरिबीच्या परिस्थितीतून तिच्या वडिलांनी म्हणजे रामचंद्र सखाराम खुटाळे यांनी खूप परिश्रम घेऊन तिला शिक्षण दिले. रामचंद्र खुटाळे यांचा बांगड्या भरण्याचा व्यवसाय आहे.या व्यवसायातूनच चार पैसे बाजूला टाकून मुलीला उच्चशिक्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते.ध्येय समोर असेल तर कोणतीही परिस्थिती तुम्हाला तुमच्या ध्येयापासून लांब ठेवू शकत नाही तसेच जिद्द आणि चिकाटी मेहनत कष्ट करायची इच्छा,आणि अभ्यासात सातत्य असेल तर यशापासून तुम्हाला कोणीही थांबवू शकत नाही.कु कल्याणी रामचंद्र खुटाळे हिने अतिशय कठोर मेहनत चिकाटी आणि सातत्य यांच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. आणि एवढ्या वरतीच न राहता तिला क्लासवन अधिकारी बनण्याचे स्वप्न ती उराशी बाळगून आहे. आई वडील शिक्षक वृंद आणि मोठा मित्र परिवार यांचा माझ्या यशात मोठा वाटा असल्याचे तिने सांगितले तिच्या या निवडीबद्दल बेलवाडी येथील जय श्रीराम प्रतिष्ठानचे श्रीराम मित्र मंडळ,श्री ब्रह्मचैतन्य जप संकुल शाखा बेलवाडी, हिंदुस्तान प्रतिष्ठान बेलवाडी,नव संजीवन सोशल ट्रस्ट शिवसेना इंदापूर तालुका, महिला बचत गट,व व्यक्तिशः नेचर डिलाईट डेअरी परिवाराचे अध्यक्ष अर्जुन देसाई राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष ॲड शुभम निंबाळकर,राजवीर दूध डेअरीचे चेअरमन कीर्ती कुमार जामदार,शिवसेनेचे इंदापूर तालुकाप्रमुख रामचंद्र जामदार,सहकार सेनेचे इंदापूर तालुकाप्रमुख अनिल कदम,बेलवाडी चे माजी सरपंच माणिक जामदार,सामाजिक कार्यकर्ते प्रकाश खैरे पाटील,नानासाहेब पवार,हनुमंत जाधव,दादासो यादव प्रकाश शेळके त्याचबरोबर बेलवाडीतील स्थानिक कार्यकर्ते गणेश मोहोळकर अमोल शिर्के पोलीस कॉन्स्टेबल सागर जामदार,कृष्णा जाधव आदी पदाधिकारी ग्रामस्थांनी कल्याणी व तिचे वडील रामचंद्र सखाराम खुटाळे यांचे अभिनंदन करून कल्याणीस पुढील कार्यास खूप खूप शुभेच्छा दिलेल्या आहेत.व लवकरच बेलवाडी व पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने तिचा सत्कार घेण्याचं नियोजन सुरू असल्याची माहिती मयुरेश्वर बेकरीचे सर्वेसर्वा अमोल शिर्के यांनी दिली.

# तांबाटीचे ग्राम पंचायत अधिकारी प्रशांत कदम आदर्श ग्राम पंचायत अधिकारी..

## अभ्यासू ,विनम्र,संवेदनशील मनाचे लोकसेवक अधिकारी..

**दैनिक युवक आधार**
**साबीर शेख । खालापूर । वार्ताहर :** आदर्श ग्राम पंचायत अधिकारी म्हणून ग्रुप ग्रामपंचायत तांबाटीचे ग्राम पंचायत अधिकारी प्रशांत कदम यांची राज्य सरकारने निवड केली असून ग्रामविकास सचिव महाराष्ट्र राज्य यांनी पत्र देऊन अभिनंदन केले आहे, त्यामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सन २०२२/२३ व सन २०२३/२४ या कालावधीत ग्राम पंचायत कामकाज अतिशय उत्कृष्ट कामगिरी केलेल्या ग्राम पंचायत अधिकारी यांची निवड राज्य स्थरावर राज्य सरकारने केली आहे. पूर्ण जिल्ह्यातून एकाच अधिकाऱ्याची निवड केली जाते, रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी ग्राम पंचायत अधिकारी प्रशांत कदम यांचे कामकाज अभिनंदनीय आहे, असा शेरा मिळाला आहे. यशवंत ग्राम अभियान यशस्वी करण्यासाठी प्रशांत कदम यांचे विशेष योगदान आहे. माझी वसुंधरा अभियान ४.० त्यांनी कोकण विभागातून प्रथम क्रमांक मिळवला आहे, माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये त्यांचे नामांकन अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या काळात अनेक योजना राबविताना निसर्गाचा होणारा हास थांबविण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली आहे. त्याचेच फलित म्हणून माझी वसुंधरा अभियान अंतर्गत त्यांची रत्नागिरी येथील कार्यशाळेत निवड झाली होती. त्यांच्या कामाचे मूल्यांकन पाहता राज्य सरकारने त्यांना राज्यस्तरीय आदर्श ग्राम पंचायत अधिकारी म्हणून निवड केल्याचे १५ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णय पत्रात उल्लेख झाला आहे. ही निवड झाल्याने प्रशांत न कदम याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# गावातली मुलगी थेट टोकियोच्या मेट्रो साईटवर, अंकिताची स्वप्नवत भरारी!

## शेतकऱ्याच्या घरात जन्म, गावच्या शाळेत शिक्षण आणि थेट जपानच्या मेट्रो प्रकल्पावर साईट इंजिनियर पदावर निवड !

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी । राजेश भडांगे :** शेतकऱ्याच्या घरात जन्म, जिल्हा परिषद शाळेत शिक्षण आणि थेट जपानच्या टोकियो शहरात मेट्रो प्रकल्पावर साईट इंजिनियरची जबाबदारी! लहानशा गावातून उंच भरारी घेणं हे स्वप्न वाटतं, पण ती भरारी खरंच घेणाऱ्या काही जिद्दी व्यक्ती असतात.

अशाच जिद्दीची, मेहनतीची आणि ध्येयाने पेटलेल्या वाटचालीची प्रेरणादायी कहाणी आहे शिरवाडे वाकद येथील कु.अंकिता संतोष काकड हिची. आईवडिलांना मुलगी पोलीस व्हावी असं वाटत होतं, पण अंकिताच्या मनात काहीतरी वेगळंचं चाललं होतं.

आपली ओळख आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण करायची. आणि तिने ते करूनही दाखवलं.

आज ती जपानमधील टोकियो शहरात, मेट्रो रेल प्रकल्पावर साईट इंजिनियर म्हणून जबाबदारी सांभाळणार आहे.गावातील जिल्हा परिषद शाळेतून शिक्षणाची सुरुवात, कोपरगावच्या संजीवनी महाविद्यालयातून स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगपर्यंतचा प्रवास आणि त्यातून थेट जपानमध्ये मोठ्या पदावर निवड. अंकिताची ही वाटचाल म्हणजे स्वप्न, अभ्यास, चिकाटी आणि धैर्य यांचं उत्तम उदाहरण. जगदीश शिंदे यांच्याकडून ऑनलाइन माध्यमातून जपानी भाषा आत्मसात करत, डॉ. ए.एस. सय्यद, अतुल मोकळ व सुधीर गायखे यांच्या मार्गदर्शनाखाली अंकिताने जपानी 'ओपन अप कन्स्ट्रक्शन' या नामांकित कंपनीत साईट इंजिनियर म्हणून जागा मिळवली आहे.

मेट्रो प्रकल्पात काम करताना तिला राहण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था, वाहन आणि तब्बल १८ लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज मिळणार आहे. तीन महिन्यांचे विशेष प्रशिक्षण भारतातच होणार असून त्यासाठी जपानमधून तज्ञांचे पथक येणार आहे.

आपल्या मुलीने पोलिस व्हावे असे स्वप्न पाहणाऱ्या वडिलांच्या आकांक्षांना नवी दिशा देत, त्या स्वप्नाला आंतरराष्ट्रीय कर्तृत्वाची किनार देणारी अंकिता ही नव्या पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

**जिल्हा परिषद शाळेतून शिकून जपानपर्यंत पोहोचणं ही केवळ तिचीच नव्हे तर संपूर्ण गावाची शान आहे. ही गोष्ट इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा देणारी आहे. अंकिताची ही यशोगाथा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक दीपस्तंभ ठरावी अशीच आहे. तिच्या या प्रेरणादायी यशामुळे 'शिरवाडे वाकद' चं नाव आता आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलं आहे.**

**- डॉ.श्रीकांत आवारे**
**सरपंच**

**अंकिता पोलीस अधिकारी होईल हे आमचं स्वप्न होतं. मात्र, तिच्या मनाच्या ठरलेल्या मार्गावर तिनं चालायला सुरूवात केली आणि आज ती जागतिक पातळीवर यशस्वी झाली आहे. आम्हाला तिचा गर्व आहे, तिच्या यशात तिच्या मेहनतीचं योगदान मोठं आहे.**

**- संतोष काकड**
**वडील**

**माझ्या यशामध्ये कुटुंबाचं आणि शिक्षकांचं अनमोल योगदान आहे. कुटुंबाची साथ आणि शिक्षकांचं मार्गदर्शन यामुळेच मी आज इथे आहे. माझ्या पालकांना मी पोलिस व्हावं अशी इच्छा होती, मात्र ते प्रत्येक पावलावर माझ्या निर्णयांचा आदर करत मला ध्येय प्राप्त करण्यासाठी प्रेरणा देत होते. आवड असलेले ध्येय मोठे असले तरी ते साध्य करण्यासाठी जिद्द आणि मेहनत दोन्ही महत्त्वाचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत हार मानू नका. आपल्या स्वप्नांच्या मागे जाण्याची क्षमता तुमच्यात आहे. केवळ विश्वास ठेवा आणि धैर्याने पुढे जा.**

**- अंकिता काकड**



# मंथन स्कॉलरशिप मध्ये जिल्हा परिषद शाळा करवले पनवेल चा १०० % निकाल.




**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी । रणिता ठाकूर**

**उरण रायगड** : रायगड जिल्ह्यामधील पनवेल तालुक्यातील तळोजे केंद्रातील रायगड जिल्हा परिषदेची वरिष्ठ प्राथमिक शाळा करवलेचे विद्यार्थी राज्यात विभागात तसेच केंद्रस्तरावर चमकले. हया शाळेतील राज्यस्तरीय मंथन स्कॉलरशिप साठी बसलेले पहिली, दुसरी ,तिसरी ,चौथी चे २७ सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्या मध्ये इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी कुमारी देवांशी विश्वास पाटील ही राज्यात सातवी व कोकण विभागात दुसरी आलेली आहे. तसेच इयत्ता दुसरीतील विद्यार्थिनी रिद्धी अजय पाटील राज्यात सोळावी व विभागात अकरावी आलेली आहे. तसेच इयत्ता तिसरीतील विद्यार्थी रियांश उत्तम पाटील केंद्रस्तरावर प्रथम क्रमांकावर व कुमारी सेजल बाळकृष्ण पाटील केंद्रस्तरावर द्वितीय क्रमांक पटकावण्यात यशस्वी झालेली आहे.आपल्या विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेचे नाव तालुक्यात विभागात आणि राज्य स्तरावर चमकवल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीने शाळेचे सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला, तसेच मुख्याध्यापक प्रदीप दीक्षित सर, शाळेचे ज्येष्ठ शिक्षक किरण म्हात्रे ,धीरेंद्र ठाकूर सर व उपशिक्षिका अरुणा कवठे मॅडम, अहिरे मॅडम यांचा शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.विशेष करून इयत्ता तिसरी व चौथीच्या वर्गाचा शंभर टक्के निकाल लावणारे वर्गशिक्षक शिवव्याख्याते धिरेंद्र ठाकूर सर व पहिली दुसरीच्या वर्गाचा शंभर टक्के निकाल लावणाऱ्या अरुणा अहिरे मॅडम यांचा शाळा व्यवस्थापन समिती ग्रामस्थ व पालकांकडून विशेष कौतुक व सत्कार करण्यात आला.ह्या कार्यक्रमात राज्य विभाग आणि केंद्रस्तरावर क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांनाही शाल पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्यात आली.इतर उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचेही शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार व कौतुक करण्यात आले.या सत्कार सोहळा प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सोनम चिखलेकर, उपाध्यक्ष रुपेश पाटील तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष सुनील पाटील इतर सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. एकंदरीत या शाळेतील विद्यार्थ्यांनी घव-घवीत यश मिळवल्याबद्दल सर्वांनी शाब्बासकीची थाप दिली आहे.

# आम्ही हिंदू आहोत, हिंदी नाही"

## अलिबागमध्ये मनसेचे ठळक बॅनर, स्थानिक नेतृत्वाकडून हिंदी विरोधात स्पष्ट भूमिका

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे । रेवदंडा** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली अलिबाग तालुक्यात आज सकाळपासून काही ठिकाणी ठळक बॅनर झळकले आहेत. बॅनरवर लिहिलं आहे: "आम्ही हिंदू आहोत, हिंदी नाही!" हे वाक्य सध्या संपूर्ण कोकणात चर्चेचा विषय ठरत आहे.या मोहिमेचा पुढाकार घेत मनसे अलिबाग तालुकाध्यक्ष सिद्धू म्हात्रे यांनी स्पष्ट सांगितले की, "हिंदुत्व हे आमचे तत्व आहे, पण त्यासाठी आमच्या मातृभाषेचा, मराठी अस्मितेचा अपमान खपवून घेतला जाणार नाही. महाराष्ट्रात राहायचं, तर मराठीला मान दिलाच पाहिजे."ही प्रतिक्रिया विशेषतः अलीकडील काही घटना व हिंदी भाषेला देण्यात येणाऱ्या अवाजवी प्राधान्याच्या पार्श्वभूमीवर आली आहे.

मनसेच्या या भूमिकेने स्थानिकांमध्ये उत्सुकता आणि चर्चेला उधाण आले आहे.सिद्धू म्हात्रे यांनी सांगितले की, "हिंदी ही राष्ट्रीय भाषा नाही, ती फक्त एक भाषा आहे. मराठी माणसाला दुय्यम लेखणं आम्ही सहन करणार नाही. हे बॅनर म्हणजे इशारा आहे आमचा अभिमान जागवण्याचा."या घोषणांवर आता इतर राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांची काय प्रतिक्रिया येते, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.




# नरवीर सूर्याजी मालुसरे यांच्या गावात ग्रामदैवत आई नवलाई-भैरी पुन: प्राणप्रतिष्ठा आणि पुनर्रचित मंदिराचा उदघाटन सोहळा

दैनिक युवक आधार
वार्ताहर : सुभेदार नरवीर तान्हाजी आणि सूर्याजी मालुसरे यांच्या साखर गावाचे ग्रामदैवत आई नवलाई-भैरी यांची पुनः प्राणप्रतिष्ठा ( जीर्णोद्धार ) आणि पुनर्रचित मंदिराचा उदघाटन सोहळा दिनांक २४ व २५ एप्रिल २०२५ रोजी संपूर्ण दोन दिवस धार्मिक आणि पारंपरिक रितिरिवाज पूर्ण करून पोलादपूर तालुक्यात संपन्न होत असल्याचे अध्यक्ष विनायकदादा मालुसरे आणि संतोष महादेव मालुसरे यांनी पत्रकार परिषदेद्वारे सांगितले आहे.सुभेदार नरवीर तान्हाजी मालुसरे यांचे पराक्रमी बंधू नरवीर सूर्याजी मालुसरे यांची चिरनिद्रा घेणारी समाधी आणि त्यावेळी त्यांची सौभाग्यवती सती गेल्या त्यांची सतीशिळा साखर गावात आहे. ८ वाड्यांची अशी पार्श्वभूमी असलेले साखर गाव पोलादपूर तालुक्यातील कामथी नदी, ढवळी नदी आणि महाबळेश्वरातून उगम पावलेल्या सावित्री नदी या तीन नद्यांच्या तिरावर वसलेले एक मोठे सुंदर गाव. गावाला फार पूर्वीपासून ऐत्याहासिक, सामाजिक, राजकीय, पारमार्थिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे.दिनांक २३ एप्रिल २०२५ सकाळी ७ वाजता नवीन मूर्तीचे आगमन त्यानंतर गाव प्रदक्षिणा करीत टाळ-मृदंग, सनई-चौघडा, लेझीम, ढोल ताशा यांच्या गजरात शोभायात्रा. २४ एप्रिल २०२५ सकाळी १० ते दुपारी २ वा. पर्यंत वेदशास्त्र संपन्नगुरुजी-संजय कुलकर्णी यांच्या हस्ते प्रधान संकल्प, श्री गणेश पूजन, पुण्यहवाचन, मुख्य देवता स्थापना, नवग्रह स्थापना, वास्तूप्रसाद होमहवन मूर्तीचे अग्नुतारण, जलाधिवास, धान्याधिवास प्रधान हवन, मूर्तीचा पिंडिकान्यास, होमहवन होणार आहे. २५ एप्रिल २०२५ सकाळी




८ वाजता मुख्यदेवता आई नवलाई आणि जोगेश्वरी, वाघजाई, भैरी, बापदेव, महादेव, जननी, सालूबाई, कालभैरी या मूर्तीची स्वानंद सुखनिवासी प. पू. गुरुवर्य अरविंद नाथ महाराज यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा कलशारोहन - परमपूज्य योगीराज ब्रह्मचारी ह. भ. प. एकनाथ महाराज लाखे होणार आहे. दुपारी १ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध हलगीवादक राजू आवळे पथक यांचे हलगी वादन. संध्याकाळी ५ ते ६ वा. साखर गावातील वारकऱ्यांचे सामुदायिक भजन, गावातील महिलांचा हरिपाठ तर आळंदी येथील ह. भ. प.एकनाथ लाखे महाराज रात्रौ ९ ते ११ वाजता कीर्तन होणार आहे. रात्रौ १२ नंतर जेजुरी येथील जागरण गोंधळ पोलादपूर तालुक्यातील समाजातील सर्व समाजधुरीण, सगे सोयरे, आप्त, इष्टमित्र परिवाराने अत्यानंदाने या धार्मिक कार्यक्रमाला मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री. भरत चिमाजी चोरगे (उपाध्यक्ष), श्री. बाजीराव विठोबा मालुसरे (सचिव), श्री. सखाराम रामचंद्र बांद्रे (खजिनदार)श्री. दीपेश परशुराम मालुसरे (कार्याध्यक्ष) यांनी केले आहे.

## बोरीच्या उपसरपंचपदी श्री पांडुरंग कुचेकर यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**
**सणसर । विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील बोरी ग्रामपंचायतचे उपसरपंच श्री हनुमंत सदाशिव धायगुडे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवरती श्री पांडुरंग सुभाष कुचेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.सरपंच सौ मंदा विजय ठोंबरे यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या निवडणुक कार्यक्रमाप्रसंगी बोरी ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी श्री कर्चे साहेब माजी सरपंच श्री रामचंद्र जोरी माजी उपसरपंच श्री रमेश अण्णा शिंदे बोरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन श्री मनमोहन पाटील माजी उपसरपंच राजेंद्र शिंदे युवा नेते अतुल जगताप बोरी विविध विकास सहकारी सोसायटीचे संचालक श्री रमेश शिंदे पुणे जिल्हा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष श्री वैभव देवडे इंदापूर तालुका माहिती अधिकार तालुका उपाध्यक्ष श्री राहुल पाटील युवा नेते मयूर ठोंबरे सागर शिंदे बोरी ग्रामपंचायतचे माजी सदस्य मदन वाघमोडे जय मल्हार केटरर्स प्रोप्रायटर श्री मार्तंड नाचन ग्रामपंचायत सदस्य सचिन धालपे,हर्षद वाघमोडे,माऊली पाठक,बोरी येथील सर्व युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.या निवडणुकीत बोरी गावचे एकीचे स्वरूप पाहिला मिळाले.यावेळी बोरी गावचे नूतन उपसरपंच श्री पांडुरंग कुचेकर यांनी सर्व ग्रामस्थांचे आभार मानले.

## सन 2023( 24 ) चा महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने सन्मानित श्री.संजयजी नवघरे यांचा वाशिममध्ये भव्य नागरी सत्कार

**दैनिक युवक आधार**
**उप जिल्हा प्रतिनिधी । वाशिम । गजानन पवार** : राज्य शासनाच्या वतीने शेलू बु.या ठिकाणी ग्राम अधिकारी म्हणून सेवेत कार्यरत असणारे श्री. संजयजी नवघरे यांना "आदर्श ग्रामसेवक पुरस्कार" मिळाल्याबद्दल वाशिम जिल्ह्यातील समस्त गोपाळ समाज बांधवांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार शनिवार, दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी करण्यात आला.

या कार्यक्रमात समाजातील सर्वच थरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या नागरी सत्कार समारंभाचे अध्यक्षस्थान गोपाळ समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजुभाऊ नवघरे यांनी भूषवले.कार्यक्रमाला समाजातील ज्येष्ठ, श्रेष्ठ, बुद्धिजीवी, महिला भगिनी आणि युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. संजयजी नवघरे यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा लेखाजोखा सादर करताना, ग्रामविकासाच्या विविध उपक्रमांतून समाजप्रबोधन आणि शाश्वत विकासाची दिशा कशी साधली गेली, हे अत्यंत प्रभावी पद्धतीने मांडले.



त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याला समाजबांधवांनी भरभरून दाद दिली. त्यांच्या प्रयत्नांनी गावात शिक्षण, स्वच्छता, महिला सक्षमीकरण, जलसंधारण, वृक्षारोपण आणि लोकसहभाग वाढवण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आली आहेत. त्यांच्या आदर्श कार्यशैलीची प्रेरणा घेऊन अनेकांनी पुढे येण्याची गरज आहे, असे उद्‌गार या वेळी विविध मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संपूर्ण गोपाळ समाजाने एकत्रितपणे परिश्रम घेतले.

या प्रसंगी सन्मानचिन्ह, शाल-श्रीफळ देऊन संजयजी नवघरे यांचा गौरव करण्यात आला.

सत्कार समारंभाने संपूर्ण परिसरात एक सकारात्मक ऊर्जा निर्माण केली असून, संजयजी नवघरे यांचे कार्य भविष्यातील अनेक सेवकांसाठी दीपस्तंभ ठरेल, असा विश्वास समाजबांधवांनी व्यक्त केला.

# सिडकोच्या हस्तांतरण शुल्काविरोधात सिवूड्समध्ये विशेष बैठक

## शुल्क रद्द करण्यासाठी आंदोलनाची चेतावणी




**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे । रेवदंडा** : सिडकोकडून आकारण्यात येणाऱ्या हस्तांतरण शुल्काच्या (ट्रान्स्फर चार्जेस) विरोधात आवाज उठवण्यासाठी नवी मुंबई हाउसिंग फेडरेशनच्या वतीने काल शुक्रवार, दि. १८ एप्रिल रोजी सिवूड्स येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीला विविध हाउसिंग सोसायट्यांचे पदाधिकारी, सहकार भारतीचे प्रतिनिधी तसेच सिडको वसाहतीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीत सिडकोवर कालबाह्य व अन्याय्य शुल्काद्वारे नागरिकांकडून पैसे उकळल्याचा आरोप करण्यात आला. सहकार भारती नवी मुंबई जिल्हाध्यक्ष प्रमोद जोशी म्हणाले, "नवी मुंबईच्या देखभालीसाठी काहीही योगदान नसतानाही सिडको नागरिकांकडून ट्रान्स्फर चार्जेसच्या नावाखाली शुल्क आकारत आहे, जे पूर्णपणे अस्वीकार्य आहे. महसूल खाते देखील असे शुल्क घेत नाही, मग सिडको का घेते?"नवी मुंबई हाउसिंग फेडरेशनचे सुनील चौधरी यांनी स्पष्ट केले की, "सिडकोने गेल्या अनेक वर्षांपासून जमिनीच्या अनेक पट किंमती नागरिकांकडून वसूल केल्या आहेत. तरीही ट्रान्स्फर चार्जेसच्या नावाखाली सामान्य माणसांची लूट सुरू आहे. जोपर्यंत हे शुल्क रद्द होत नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरू राहील."या मुद्द्यावर कायदेशीर भूमिकाही अधोरेखित करण्यात आली. भास्कर म्हात्रे यांनी सांगितले, "उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की सिडकोने हस्तांतरण शुल्क आकारू नये. पालिका वेगळे शुल्क घेते आणि नागरिकांना सुविधा पुरवते, मात्र सिडको कोणत्याही सुविधा न पुरवता शुल्क आकारत आहे. त्यामुळे हा अन्याय आम्ही सहन करणार नाही.

"बैठकीत सर्व सोसायट्यांनी एकत्र येऊन सिडकोविरोधात लढा देण्याचे ठरवले असून, यानिमित्ताने प्रत्येक नोडमध्ये जनजागृती केली जाईल आणि राजकीय नेत्यांची भेट घेऊन या अन्यायकारक शुल्काविरोधात पाठपुरावा केला जाणार आहे.

# माकड आणि वानरांचा वाढता प्रादुर्भाव

## कोकणचे दु:ख कोणी दूर करेल का ?

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी । सचिन पवार । माणगांव । रायगड** : कोकणात माकड आणि वानर हे दोन प्राणी नसले तर कोकण समृद्ध होईल. गेली कित्येक वर्षे न मारल्यामुळे काहिवर्षात यांची संख्या शंभरपटीने वाढली आहे. ग्रामीण भागात नागरिक कष्ट करून स्वर्ग निर्माण करतील. आज लाखो रुपयांचे कष्ट पाण्यात जात आहेत. हे दुःख कोणाला समजेल काय? आंबा राखणीसाठी आज लाखो रुपये खर्च होत आहेत. केळी, भाजीपाला, नारळ,फळभाज्या,फणस,चिकू,पेरू,पपई ,शेवगा,कुळीथ,उडीद, इ चे लाखो रुपयांचे उत्पन्न ही जोडी आणि त्यांची प्रचंड वाढलेली जमात फस्त करते. शिवाय नळे, पत्रे फोडणे यांचे नुकसान वेगळे. माकडे तर घरात घुसून नासधूस करायला लागली आहेत. अंगावर येण्याचे धैर्य त्याच्याकडे वाढत चालले आहे. आर्थिक नुकसान , हाकलण्याचे शारीरिक नुकसान आणि वेदना, हतबलता चे मानसिक नुकसान...किती सोसायचे?मागे मी पंतप्रधान कार्यालयाकडे याबाबत मांडले होते त्यावेळी वनाधिकारी माझ्याकडे येऊन नुकसान भरपाई जीआर देऊन गेले. त्यात प्रचंड त्रुटी आहेत. हे त्यांनाही माहीत आहे. पंचनामा त्यावरील सह्या, खाल्लेले नुकसान कसे दाखवणार,राखण साठी होणारा त्रास, नळे,पत्रे फोडलेले इ. बाबत भीक नको पण कुत्रा आवर अशी स्थिती आहे.आज आम्ही कोकण सोडून इतर ठिकाणच्या भाजीपाला,शेवगा,चिकू,पेरू,केळी यांच्या बहरलेल्या बागा पाहतो. आम्ही आंबा,पपई,शेवगा,चिकू,पेरू,केळी,भाजीपाला इ. चे प्रचंड उत्पादन घेऊ शकतो. पण आम्ही हतबल आणि असहाय आहोत. खरतर कुणी वालीच नाही असं झालंय.हिमाचल प्रदेश मध्ये वानर आणि माकडे यांना उपद्रवी पशु जाहीर करून मारायला सुरुवात केली शिवाय मारण्यासाठी अनुदान देणे सुरू केले असे वाचनात आले. महाराष्ट्रातसुद्धा असं करण्याची गरज आहे. अन्यथा भविष्यात कोकणातील शेतकरी आत्महत्या करू लागला तर आश्चर्य वाटायला नको. आज कोकणातील शेतकरी आत्महत्या करत नाही कारण इथे एक पीक पद्धतीऐवजी बहुपिक पद्धत आहे .दोन माड,दोन फणस,थोडी शेती,दोन कलमे,चार जांबी इ प्रत्येक घरात असल्याने त्याला काहीतरी मिळतं. मात्र आज वानर,माकडांनी त्यावर घाला घातला आहे. कोकणातील ग्रामीण भागातील ही परिस्थिती कोणी लक्षात घेईल काय? शहरात बसून सल्ले देणे खूप सोपे आहे. एकदा राहून अनुभवा..या परिस्थितीतून कोकणी माणसाला दिलासा मिळेल काय?



माणूस जगला पाहिजे की प्राणी जगला पाहिजे हे सुद्धा एकदा ठरवण्याची गरज आहे. सरकार उपद्रवी पशु म्हणून वानर,माकडे याना जाहीर करेल काय? नाहीतर रीतसर पत्र देऊन महिनाभरात आता उपोषणाला बसणार आहे. असे दैनिक युवक आधारच्या प्रतिनिधी शी बोलताना अविनाश काळे यांनी सांगितले.

# राळेगाव मध्ये ४ दुकानांची टिनपत्रे तोडून चोरी



**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी । जितेंद्र खोडे**

**राळेगाव** : शहर परिसरात बस स्टँड समोरील दुकान लाईनमध्ये १८ एप्रिलच्या रात्री १ ते ५ च्या दरम्यान चार दुकानांमध्ये अज्ञात आरोपीने चोरी केली. प्रशांत प्रभुदास रुपारेल हे सकाळी दुकान उघडण्यासाठी ९.३० वाजता पोहचले त्यांना दुकानाची टिन पत्रे काढून दुकानातील स्टेशनरी बेन्टेक्स ज्वेलरी २०,००० रुपये अंदाजे किंमत १० हजार रुपयाची कॉस्मेटिक्स स्कीम,फेस वॉश,नगदी गल्ल्यातील ४००० हजार रुपये असा एकूण ३४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरट्याने हडप केला आहे. तसेच त्याच दुकानाला लागून अशोक हेमराज वर्मा यांचे किराणा दुकान आहे त्या किराणा दुकानातील २५ नग बिडी पुढे अंदाजे ४००० हजार रुपयाचे आणि गल्ल्यातून ३५०० असा एकूण ७५०० रुपयाचा मुद्देमाल चोरट्याने हडप केला.तसेच त्याच दुकानात लागून पुन्हा तिसरे दुकान मयूर बाबाराव घोडे यांचे बुक डेपो आहेत त्या बुक डेपो मधील गल्ल्यातील ३५०० रुपये नगदी स्वरूपात चोरट्याने हडप केले. त्यानंतर त्याच लाईन मध्ये स्वीट मार्ट चे दुकान आहेत.प्रकाश लक्ष्मण पामपट्टीवार त्यांच्या दुकानातील जुना कॅमेरा सेट अंदाजे किंमत २५०० रुपये व गल्ल्यातील २००० रुपये असा मुद्देमाल चारही दुकानातला चोरट्याने संधी साधून रात्रीच्या वेळी मुद्देमाल हडप केला.गेल्या महिन्याभर पासून एकच नाही तर अनेक दुकान फोडल्या गेली चारही दुकानातून चोरट्याने ४९ हजार ५०० रुपयाचा माल चोरुन नेल्या प्रकरणी राळेगांव पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास जमा. गोपाल वास्टर हे करीत आहे.

# ए पी आय संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विनापरवाना वाहनचालकांना विरुद्ध धडक कारवाई



**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार । चिपळूण प्रतिनिधी** : ए पी आय संजय पाटील यांच्या नेतृत्वाखाली अन अनधिकृत दुचाकी स्वार व वाहनचालकांना विरुद्ध अचानक झालेल्या कारवाई मुळे दुचाकी स्वारांसह वाहनचालकांनमध्ये मात्र चांगलीच तारांबळ उडाली. पोलिसाच्या या धडक कारवाई मुळे जनतेतून मात्र समाधान व्यक्त करण्यात येत आहे. कारण धुमस्टाईलने गाडी चालवणार्या दुचाकी स्वरांनमुळे नागरिकांना रस्त्याने चालताना जीव मुठीत घेऊन चालाव लागत होत. पोलिसाच्या अशा कारवाई मुळे चिपळूण मध्ये काही महिने धुमस्टाईलने गाडी चालवणार्या दुचाकी स्वरांचे प्रमाण संध्या कमी झाले आहे.वाहनचालकांना व दुचाकी स्वरांना सुरक्षेच्या दृष्टीने हेल्मेट व लायसन्स यासारख्या बाबीचीची जाणीव असने गरजे . यामुळे अशी कारवाई करणे गरजेचे आहे. ज्यामुळे जास्तीत जास्त दुचाकी स्वार व वाहनचालकांनमध्ये हेल्मेट व लायसन्स संदर्भात जनजागृती निर्माण होईल.

# मराठी शाळाच दर्जेदार

मार्च, एप्रिल महिन्यांमध्ये परीक्षा संपल्या की, विद्यार्थी निर्धास्त होतात कारण पुढील दीड दोन महिने त्यांच्यासाठी सुट्टीचे असतात. पण याच दोन महिन्यात पालकांना वेध लागतात ते आपल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशाचे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पालक म्हणजे ज्यांचे पाल्य पहिलीत दाखल होणार आहेत अशा पालकांमध्ये तर मोठा संभ्रम असतो. आपल्या पाल्यांना मराठी शाळेत दाखल करायचे की इंग्रजी शाळेत दाखल करायचे याबाबत त्या पालकांमध्ये मोठा संभ्रम असतो. मुलांचे शिकण्याचे माध्यम मराठी असावे की इंग्रजी यावर मग कुटुंबात मोठा खल होतो. नातेवाईक, शेजार पाजारी, मित्रमंडळी अशा पालकांना वेगवेगळा सल्ला देत असतात अशा वेळी कोणता निर्णय घ्यावा असा मोठा पेच या पालकांना पडतो. इंग्रजी भाषा ज्ञान भाषा असल्याने इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्याकडे बहुतेकांचा कल असतो आणि खरी फसगत इथेच होते. इंग्रजी येण्यासाठी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घ्यावे असे काही नाही मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही मुल चांगल्या प्रकारे इंग्रजी शिकू शिकू शकते. आज जे उच्चपदावर बसलेले नामवंत व्यक्ती आहेत ते सर्व मराठी माध्यमातूनच आणि सरकारी शाळेतूनच शिकले आहेत. खरे तर आज जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेतून दर्जेदार शिक्षण दिले जाते. आज मराठी माध्यमांच्या शाळा देखील कात टाकत आहेत. मराठी माध्यमांच्या सरकारी शाळेत गुणवान, प्रयोगशील, तंत्रस्नेही शिक्षक आहेत. सर्व शिक्षक डी एड, बी एड, एम एड असे उच्च गुणवत्ता प्राप्त आहेत. हे शिक्षक वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देतात.

मराठी माध्यमांच्या शाळेत ई लर्निंग, ॲक्टिव्हिटी बेस लार्निंग च्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. राज्यातील हजारो शाळा आय एस ओ नामांकन प्राप्त झाल्या आहेत. डिजिटल स्कूल, टॅब स्कूल या संकल्पना या शाळेतही रुजत आहेत. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या शाळेतही आता सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. गुणवत्तेच्या बाबतीतही या मराठी शाळा कोठे कमी नाहीत. ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीच असतात. नुकताच जवाहर नवोदय परीक्षेचा निकाल घोषित झाला. यात जिल्हा परिषद शाळेतीलच सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. याशिवाय मंथन, प्रज्ञाशोध या स्पर्धा परीक्षेतही मराठी शाळांचाच डंका वाजतो.जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेत मोफत शिक्षण दिले जाते. मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, मोफत शैक्षणिक साहित्य, शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्त्या मिळतात.

गुणवत्तेसह सह शालेय उपक्रमातही मराठी शाळा आघाडीवर असतात. मराठी शाळेत पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा, सहल, वनभोजन, क्षेत्रभेट, मातृ - पितृ पूजन, आनंदी बाजार, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी, विविध स्पर्धा सर्व महापुरुषांच्या जयंत्या असे विविध उपक्रम राबवले जातात.

आता मराठी माध्यमांच्या सरकारी शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी दाखल होत आहेत. आता तर सर्वच मराठी शाळेत सीबीएएससी चा अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे म्हणजे जे शिक्षण इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळेत मिळते तेच शिक्षण आता मराठी माध्यमांच्या शाळेतही मिळणार आहे तरीही शहरातील पालकांना अजूनही इंग्रजी शाळेचा मोह सुटत नाही.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून पालक त्या शाळांच्या नादी लागत आहेत. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी शिक्षणाचा बाजार केला आहे . अगदी के जी च्या प्रवेशासाठीही लाखोंची देणगी घेतली जाते शिवाय इमारत निधी, ट्रस्ट निधी तसेच वर्षभर चालणारे वेगवेगळे कार्यक्रम या माध्यमातून पैसे उकळले जातात. पालकांच्या खिशाला कात्री लावण्यासाठी या शाळा वेगवेगळे फंडे शोधत असतात. जर एखाद्या पालकांनी फी भरण्यास उशीर केला तर विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यापर्यंत मजल या शाळांची जाते. कोरोना काळात फी भरता न आलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप काही इंग्रजी शाळांनी केले आहे.


अनेक इंग्रजी शाळा शैक्षणिक साहित्य शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. २००३ मध्ये उच्च न्यायलयाने दिलेल्या निकालात शैक्षणिक साहित्य शाळेकडूनच किंवा ठराविक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही असे म्हंटले आहे. सरकारनेही वेळोवेळी तसे आदेश काढले आहेत पण या शाळांना सरकारी आदेशाचा आणि न्यायालयाच्या निकालाचा विसर पडला आहे न्यायालये व सरकारला न जुमानता आपली शैक्षणिक दुकानदारी चालवणाऱ्या या शाळांना चाप लावायचा असेल तर पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेत दाखल करण्याऐवजी मराठी माध्यमांच्या शाळेत दखल करावे.

**-श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# पक्षांसाठी वृक्षारोपणाचे नियोजन !

मागील वीस-पंचवीस वर्षांपासून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करीत असतांना अलीकडे चार -पाच वर्षांपूर्वी विचार आला कि, भविष्यात पक्षांना उपयोगी पडतील अशी झाडे लावली पाहिजेत. आणि मग त्या दिवसापासून पावसाळा सुरु झाल्यावर अशी झाडे शोधणे, ती फारच लहान असतील तर ती उगवलेल्या ठिकाणावरून (घरांच्या भिंती, घराचे छप्पर, किल्ल्याच्या भिंती, वॉल कंपाउंड इत्यादी ) सावकाश पणे काढून आणून पिशव्यामध्ये लावणे, मोठी झाल्यावर ती योग्य ठिकाणी लावणे, मोठी असतील (एक फुटपेक्षा जास्त मोठी ) तर ती व्यवस्थित काढून, काढल्यावर त्यांची मुळे काळ्या प्लास्टिक पिशवीत मोकळी झाकून ती नियोजित ठिकाणी त्याच दिवशी लावणे असे काम सुरु केले.








पहिल्याच वर्षी एका वॉल कंपाउंडवर उगवलेली दोन पिंपळची झाडे सावकाश काढून आणली. नियोजित ठिकाणी आधीच दोन खड्डे खाणून ठेवले होते त्या ठिकाणी ती लावली. त्यापैकी एक झाड जगले नाही. दुसरे झाड जगले ते आज दहा बारा फूट उंच झाले आहे.

त्यानंतर शाळेच्या छपरावर उगवलेली दोन काकडाची झाडे जुलै महिन्यात काढून आणली व ती लावली. आज ती दोनही झाडे एव्हढी मोठी झाली आहेत. या झाडांना पावसाळ्यात पाने असतात पावसाळा संपून ऊन पडायला सुरुवात झाली कि ही पाने गळून जातात. पुन्हा पाऊस सुरु झाल्यावरच पाने येतात. झाड मोठे झाल्यावर उन्हाळ्यात त्यांना फुले व फळे येतात. ही फळे पक्षी खातात. नंतर पुढीलवर्षी भिंतीच्या बाजूने उगवलेली तीन झाडे काढून आणली. दोन जास्त लहान होती म्हणून ती पिशव्यांमध्ये लावली आहेत.

एक चांगले मोठे होते म्हणून ते त्याच वर्षी जमिनीत लावले. ही तिन्ही रोपे पिंपळाची आहेत असे वाटले होते मात्र जमिनीत लावलेल्या झाडाला पुढीलवर्षी पावसाळ्यात भरपूर पाने आली. या पानांचे निरीक्षण केले असता हे झाड पिंपळचे नसून पायराचे आहे असे समजले. ऊन पडायला लागल्यावर पायराची पाने गळून जातात. उन्हाळ्यात या झाडाला साधारण वाटाण्याच्या आकाराची फळे येतात. ती छान मधुर असतात. आपणही ती खाऊ शकतो. पक्षी ही फळे खाण्यासाठी सकाळीच गर्दी करतात. दिसभरही ऊन असूनही फळे खाण्यासाठी पक्षी झाडावर येत असतात. जंगलात पायराची झाडे नद्या, ओहळ यांच्या कडेने खडाकाळ भागात आढळून येतात.

पायराचे झाड पक्षांसाठी फारच उपयुक्त आहे. मात्र ती माळारांनावर फारच कमी आढळतात. पक्षीप्रेमिंनी भिंती व घराच्या छपरावर वाढलेली रोपे पावसाळ्यात काढून ती माळरांनावर लावली तर पक्षांना त्याचा फार मोठा फायदा होईल. या बरोबरच माळावर विलायती चिंच, उंबर, वड इत्यादी झाडे लावल्यास यांची फळे खाण्यासाठी पक्षी येतात व ह्या एकाच ठिकाणी पक्षी निरीक्षणाचे चांगले ठिकाण उपलब्ध होऊ शकते. फारच उपयोगी असणाऱ्या पण घराच्या भिंती, छपरावर वाढणाऱ्या या झाडांना भविष्य नसते. ही झाडे या ठिकाणावरून काढून जमिनीवर लावण्याची मोहीम वृक्षप्रेमी लोकांनी हाती घेतली तर दुर्मिळ वृक्ष संवर्धन होण्यासाठी हातभार लागेल.




**दामू शंकर धादवड**
**( निसर्ग प्रेमी )**
**मो. नं. 9225218693**

# २०२७ पर्यंत मोतीबिंदूमुक्त महाराष्ट्र

## मिशन यशस्वीतेसाठी शासन कटिबद्ध – मुख्यमंत्री

**मुंबई** : नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी राज्य सरकारच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. वयस्क लोकांमध्ये मोती बिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता टाळण्यासाठी मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वी करण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. २०२७ पर्यंत मोतीबिंदू महाराष्ट्र हे मिशन पूर्ण करण्यासाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड या संस्थेने पुढाकार घेतला आहे, ही कौतुकास्पद बाब आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता आणि त्यावर उपाययोजना म्हणून २०१७ पासून मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन सुरू आहे. शासनाने हाती घेतलेल्या या मिशनची २०१८ मध्ये नव्याने सुरवात करण्यात आली आहे. येत्या २०२७ पर्यंत हे मिशन यशस्वीपणे राबविण्याच्या दृष्टिने विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड ही संस्था इंदिरा गांधी



वैद्यकीय महाविद्यालय (आयजीएमसी), नागपूर यांना मदत करत आहे. डब्ल्युसीएल या संस्थेच्या माध्यमातून आयजीएमसी, नागपूर यांनी गेल्या वर्षभरात साधारण चार हजार मोतीबिंदूच्या शस्त्रक्रीया केल्या आहेत. तसेच शासनासोबत केलेल्या कराराच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांच्या मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन स्वप्नपूर्तीसाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने संपूर्ण विदर्भात विविध उपक्रम राबवून यापुढील तीन वर्षात दरवर्षी साधारण चार हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी देखील ही संस्था सहकार्य करणार आहे.

ही संस्था विदर्भातील ग्रामीण भागामध्ये शिबीर घेऊन ज्यांना मोतीबिंदू आहे, त्या रुग्णाचे निदान करून त्यांना रुग्णालयामध्ये पोहोचवत त्यांच्यावर मोफत उपचार करणार आहे. तसेच या मार्फत रुग्णालयांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देतील. डब्ल्यूसीएल संस्थेचे मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशनच्या यशस्वीतेसाठी शासनाला असलेले सहकार्य पाहून इतर स्वयंसेवी संस्था या कामात पुढाकार घेतील, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

# बनावट पनीर विक्रेत्यांवर आता एफडीएची नजर

## ग्राहकांची फसवणूक करणाऱ्यांचे परवाने रद्द होणार

मुंबई : बनावट पनीर किंवा चीज ॲनालॉग वापरणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत कडक कारवाई करण्यात येत आहे. पनीर सारख्या बनावट पदार्थाची विक्री केल्याचे आढळून आल्यास अशा व्यावसायिकांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा इशारा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिला आहे.

पनीर हा खाद्य पदार्थातील आवडता पदार्थ असून त्याला बाजारात मोठी मागणी असते. विशेषतः लहान मुलांमध्ये पनीरची क्रेझ अधिक आहे. मात्र काही ठिकाणी बनावट पनीर अथवा 'चीज ॲनालॉग' वापरून ग्राहकांची फसवणूक केली जात असल्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या तपासणीत आढळून येत आहे. अशा प्रकारे ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या पनीर विक्रेत्यांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६, तसेच २०११ आणि २०२२ मधील नियमानुसार ही कारवाई केली जाईल, असा इशारा एफडीएने दिला आहे.

अन्न व औषध प्रशासन सर्व अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना त्यांच्या



### चुकीला माफी नाही

ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीला माफ केले जाणार नसून अन्न व्यावसायिकांनी नियमांचे पालन करून ग्राहकांना अचूक माहिती देणे आवश्यक आहे.

कार्यक्षेत्रातील चीज अॅनालॉग वितरकांचे खरेदी-विक्री बिले तपासण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, हॉटेल, रेस्टॉरंट, फास्ट फूड विक्रेते आणि केटरर्स यांची खरेदी बिले तपासून, पनीरच्या ऐवजी अॅनालॉगचा वापर करून ग्राहकांची फसवणूक केल्यास, कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कायद्यातील तरतुदींनुसार तात्काळ परवाना निलंबनाची कार्यवाही केली जाईल, असा इशारा मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिला आहे.

### पोषणमूल्याची माहिती ग्राहकांना देणे बंधनकारक

अन्न सुरक्षा आणि मानके (लेबलिंग व डिस्प्ले नियमन) २०२० च्या नियमांनुसार, विक्री होणाऱ्या अन्नपदार्थातील सर्व घटक व पोषणमूल्यांची माहिती ग्राहकांसमोर मांडणे बंधनकारक आहे. रेस्टॉरंट, हॉटेल, कॅटरर्स आणि फास्ट फूड विक्रेत्यांना आपल्या मेनू कार्ड्स, डिस्प्ले बोर्ड्स आणि ऑर्डर मशीनवर अचूक माहिती देणे अनिवार्य आहे.

# आगामी निवडणुकीसाठी भाजपची संघटनबांधणी

## राज्यभरात १,२०० हून अधिक मंडळाची स्थापना

**मुंबई** : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपचे कमळ फुलवण्यासाठी भाजपने रणनीती आखली आहे. राज्यात भाजपची संघटन बांधणीसह गाव खेड्यापर्यंत पोहोचत थेट मतदारांशी संवाद साधण्याचा ध्यास भाजपने केला आहे. यासाठी राज्यभरात १,२२१ मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. त्यापैकी ९६३ मंडळ अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही प्रक्रिया पद्धतीने पूर्ण झाली आहे. "संघटन हेच खरे बळ" तत्त्वावर चालत भाजपने आता महाराष्ट्रात भक्कम तयारी सुरू केल्याचे मानले जात आहे. भाजपच्या संघटनात्मक बांधणीचा हा टप्पा महाराष्ट्राच्या

### ...अशी आहेत मंडळे

| | |
|---|---|
| कोकण – ठाणे विभाग | १८४ मंडळे |
| उत्तर महाराष्ट्रात | १८४ मंडळे |
| पश्चिम महाराष्ट्रात | २२२ मंडळे |
| विदर्भात | ३१३ मंडळे |
| मराठवाड्यात | २०७ मंडळे |
| मुंबई विभागात | १११ मंडळे |

सर्व भागांतील राजकीय ताकद दृढ करण्याच्या दृष्टीने निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. राज्यभर १,२२१ मंडळ गठीत करण्यात आले असून पैकी ९६३ मंडळांची रचना जाहीर करण्यात आली आहे. त्यातील २५८ मंडळे नव्याने स्थापन केली गेली आहेत.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी ही सुरुवात मानली जाते.

न्यू इंडिया को–ऑपरेटिव्ह बँक प्रकरण

# ठेवीदारांकडून पुनरुज्जीवन किंवा विलीनीकरणाची मागणी

**मुंबई** : घोटाळ्याने बाधित न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ठेवीदारांनी आरबीआयने नेमलेल्या सल्लागार व बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांनी बँकेच्या पुनरुज्जीवन किंवा विलीनीकरणासाठी ठोस आराखड्याची तसेच ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण सुनिश्चित करण्याची मागणी केली, असे एका प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

NICB ठेवीदार फाउंडेशनने ठेवीदारांचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी आणि १३ फेब्रुवारी २०२५ पासून आरबीआयने लादलेल्या निर्बंधांमुळे निर्माण झालेला आर्थिक ताण कमी करण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली आहे.



मुंबई पोलिसांनी आतापर्यंत रु. १२२ कोटींच्या न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळ्याच्या प्रकरणात आठ जणांना अटक केली आहे.

फाउंडेशनचे अध्यक्ष टी. एन. रघुनाथा यांनी सांगितले की, ठेवीदारांचे एक शिष्टमंडळ शुक्रवारी प्रभादेवी येथील बँकेच्या मुख्य कार्यालयात आरबीआयने नेमलेले सल्लागार रवींद्र चव्हाण आणि रवींद्र सप्रा यांची नुकतीच भेट झाली.

चर्चेदरम्यान सल्लागारांनी बँकेच्या भविष्यातील शक्यता बाबत सकारात्मक पण काळजीपूर्वक आशावादी दृष्टीकोन व्यक्त केला, असे रघुनाथा यांनी सांगितले.

सल्लागारांनी बँकेच्या पुनरुज्जीवनाच्या शक्यतांबाबत सकारात्मक मत व्यक्त केले. त्यांनी यामध्ये संभाव्य विलीनीकरणाचाही विचार सुरू असल्याचे सांगितले, तरी याप्रकरणी सध्या तपशील सांगता येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले, असे रघुनाथा यांनी सांगितले.

फाउंडेशनने सध्या प्रत्यक्षात असलेली २५,००० रुपयांची रकमेची काढण्याची मर्यादा वाढवून ती प्रति खातेदार १.५ लाख रुपये करण्यात यावी, अशीही मागणी केली आहे.